
मुखदर्पण
मुखदर्पण
सचिन कृष्णा निकम
जे तुझ्या मनी तेच माझ्या मनी
ओळखुनही आपण का असे अनोळखी
मांडू कसे शब्दांत जे जे आजवर जपलेले
तुला पाहता उधाणले ते ते अंतरी लपलेले
विसरूनी देहभान जगीचे केले सर्वस्व अर्पण
उमटले सुस्पष्ट भाव मनीचे पाहिले ''मुखदर्पण''
चेतक बुक्स
ISBN : 978-93-92211-12-6

# मुखदर्पण

© सर्व हक्क सुरक्षित

**रचनाः सचिन कृष्णा निकम**

बी - 706 मॉन्ट वर्ट ग्रॅंड

पाषाण, सुस रोड

पुणे - 411021

मोबाईल ः 9890016825

email: sachinikam@gmail.com

# मनोगत

आपल्या दैनंदीन जीवनात आपण विविध रीत्या एकमेकाशी संवाद साधत असतो . आपल्या मनातील विचार आपण बोलून दाखवितो किंवा लिहून स्पष्ट करतो . थेट संवाद साधताना सर्वात मोठा वाटा असतो तो आपल्या देहबोलीचा आणि त्यात महत्वाचा म्हणजे आपला चेहरा . मनातील प्रत्येक विचारबरोबर त्याचे रंगरूप बदलते . चेहरा जणू काय आरसाच आपल्या मनाचा आणि अंतरंगाचा . श्रृंगार, हास्य, करूणा, रूद्र, वीर, भयानक, भीभत्स, अद्‌भुत आणि शांत हे नवरस मुखावर परिस्थितीनुसार उमटत असतात आणि क्षणार्धात बरेच काही सांगून जातात .

माझ्या कवितांच्या माध्यमातून मीही आपणाशी संवाद साधत आलोय . पहिल्या तीन काव्य पुस्तकांच्या सारखेच ह्याही पुस्तकात नवरसांचा आस्वाद मिळेल अशी मला खात्री आहे .

जे तुझ्या मनी तेच माझ्या मनी

ओळखुनही आपन का असे अनोळखी

मांडू कसे शब्दांत जेजे आजवर जपलेले

तुला पाहता उधानले तेते अंतरी लपलेले

विसरूनि देहभान जगीचे केले सर्वस्व अर्पण

उमटले सुस्पष्ट भाव मनीचे पाहिले “मुखदर्पण”

# अर्पणपत्रिका

आदरणीय आजी आजोबा आणि आई बापू
ज्यांनी माझ्यावर सुसंस्कार केले आणि भरभरून प्रेम केले .

प्रिय पत्नी सौ . ममता हिने वळोवेळी प्रात्साहन दिले
आणि माझ्या कवितांवरही तितकेच प्रेम केले .

# अणुक्रमणिका


1 . भूवैकुंठ पंढरी
2 . कालप्रवाह
3 . गुरूकृपा
4 . माझ्यातला मी
5 . हरिनामेव सर्वार्थसाधनम्
6 . येरझारा
7 . यमदूत
8 . तृषार्त चातक
9 . वाटचाल
10 . मुकुलगंध
11 . ऋतुचक्र
12 . तुझी जादू
13 . मला सूर्य व्हायचय
14 . एक झलक
15 . अगस्त क्रांती
16 . तिरंगा प्यारा
17 . बीती बाते
18 . तू मेरी जिंदगी है
19 . मुन्ना टपोरी
20 . मी लोनकर
21 . खेळ खेळूया हसरा
22 . संचित सारे अर्पिले
23 . Heart’s Song
24 . रूसलास कारे कान्हा
25 . नटखट

# भूवैकुंठ पंढरी

**23 ऑगस्ट 2012**

पुंडलिका पुंडलिका जाहले भूवैकुंठ पंढरी || ध्रृ . ||

आनंदी आनंद तरंग चंद्रभागेच्या तीरी
द्वारकेचा राणा पाहुणा पुंडलिका घरी
भक्ता भेटाया आला आला श्रीहरी
यावे यावे सहर्ष स्वागत यावे गिरिधारी ||1||

श्यामसुंदर रूपमनोहर धन्य धन्य अंतरी
कमलनयन प्रसन्नवदन पुष्पवृष्टी अंबरी
तेजोवलय मंगलमय आनंदालय मुरारी
यावे यावे सहर्ष स्वागत यावे चक्रधारी ||**2**||

मातापित्यांची सेवामग्न पाहात उभे विटेवरी
पावन पावन अवनीभुवन नामगजर रखुमाईवरी
नाचती वैष्णव  दिंडी पताका टाळमृदुंग तालावरी
यावे यावे सहर्ष स्वागत यावे मुरलीधारी ||**3**||

## कालप्रवाह

**4 जून 2012**

काळाचा प्रवाह धावतो संतत

ना ठाऊक उगम नाही अंत

नक्षत्रांच्या नक्षीने नटला आसमंत

तेव्हापासून आतापर्यंत प्रवाहे शाश्वत

देह ही नौका आत्मा नाविक

गाठाया पैलतीर अडथळे कित्येक

हरिनामाचा वल्हा वल्हव संतत

होईल प्रवास पुढचा सुखवंत

पाहा जन विषये गुंतविती मन

विसरले अंतरीचे चैतन्य चिरंतन

मिरविती देह मिथ्य शोभिवंत

सत्य हे उघड आहे नाशवंत

ना थांबला कुणासाठी ना धावला कुणापाठी

राजा असो वा रंक एकच न्याय सर्वांसाठी

माझे कर्म, माझे दैव, माझे संचित होई खंत

न डगमगला, न ढळला प्रसंगी तोचि साधुसंत .

# गुरूकृपा

**21 ऑक्टोबर 2012**

पहिला हुंकार जणू प्रणव ओंकार
शिकविला सदाचार बिंबविले संस्कार
विकटसमयी दिली मायेची सावली
प्रथम वंदन गुरू माऊली

पहिल पाऊल जणू यशाची चाहूल
धीर पोत्साहन शाब्बासकीची थाप
पथावर अंधा-या बनले कंदील
द्वितीय नमन गुरू वडील

बुद्धीला चालके केले विचारांना बोलके
विज्ञानातून मिटवले अज्ञानाचे गलके
आयुष्याच्या वळणावर बनले मार्गदर्शक
तृतीय प्रणाम गुरू शिक्षक

विचारांची ठेव दाखविला अंतरंगातील देव
सद्सद्विवेक नीतीमत्ता विद्वत्ता
घडले घडवले प्रेरणेतून संत
शतशः नमन गुरू ग्रंथ

जाहली मजवर कृपा गुरूची

सौभाग्य माझे .

जाहली सुलभ वाटचाल पुढची

## माझ्यातला मी

**24 डिसेंबर 2011**

क्षणभंगुर दिसुनही सारे, त्यापाठी का धावतो

जे कधी नव्हतेच माझे, त्यासाठी उगी झेपावतो

सोबतीला नाही कोणी, पाहुनि अखेरी भांभावतो

अंतःसमयी स्वतःला शोधाया, माझ्यातला मी डोकावतो

अभ्रक, बालक, युवक, वयस्क, चालतो जीवनप्रवासी

ओळख एकच निरंतर माझी, बदलतो वाहने थांब्यापाशी

जग हे भौतिक नाशवंत, मी मात्र अखंड शाश्वत

गवसला काले अनंत, माझ्यातला मी खरा सत्

दंभे फुगला कूपमंडूक, तरावया सागर नव्हते ठाऊक

ऐका अल्पज्ञाची फजिती, काय सांगावी पुढची दुर्गती

अवांतर रटाळ विषय ऐहीक, मी मात्र पूर्णज्ञ दैवीक

गवसला काले अनंत, माझ्यातला मी खरा चित्

पंचेंद्रियांचा दास, पुरवी चोचले तयांचे खास

मिथ्य सुखाच्या शोधात, विसरला प्रेमझरा अंतःकरणात

जग हे दिसते व्यथित, मी मात्र सदा प्रफुल्लित

गवसला काले अनंत, माझ्यातला मी खरा आनंदित

मी श्रेष्ठ, माझे आप्तेष्ट, मला चविष्ट, मम विषय पुरे

म्हणे सचिन, होता आत्मबोध, दिसे सच्चिदानंद स्वरूप खरे .

## हरिनामेव सर्वार्थसाधनम् | (अनुष्टुप छंद)

**2 फेब्रवारी 2012**

**ईशदर्शनाय व्यर्थम् ध्यानामि वनात् नासग्रे |**

**स तिष्ठति मम ह्दये तस्य नामम् जिव्हाग्रे || 1 ||**

- भगवंताच्या दर्शनासाठी मी नाना योगसाधना केल्या . वनांमध्ये जाऊन नाकाच्या टोकावर लक्ष्य केंद्रीत करून ध्यान लावून बसलो . पण निष्फळ व्यर्थ वेळ दवडला . तो भगवंत स्वयम् माझ्या ह्दयात वसलेला आहे असे समजल्यावर आपोआपच त्या हरीचे गोड नाव माझ्या जिभेच्या टोकावर आले .

**धन्यवादः हरि कृपाळु सुलभ साधनाय |**

**स्मरामि नामम् कदापि कुत्रापि संवादार्थाय ||2||**

- हे हरि तुझे अनेक धन्यवाद . तू किती कृपाळु आहेस . इतके सुलभ साधन तू आम्हाला दिलेस . आता आम्ही तुझ्याशी केव्हाही कुठेही थेट तुझ्याशी संवाद साधू शकतो फक्त तुझे नामस्मरण करून .

**हरिनामम् इति आभूषणम् धारयामि कण्ठे |**

**नावश्यकम् बाह्य शोभा न मिथ्य अपरा स्तुतिम् ||3||**

- हरिनाम नावाचा दिव्यालंकार मी माझ्या कंठात धारण केला आह . आता मला हरिभक्त म्हणून ओळखण्यासाठी अन्य बाह्य अलंकारांची आवश्यकता नाही किंवा इतरांच्या खोट्या स्तुतीची तर अजिबात गरज नाही .

**नाहं धारयामि जटा नाहं शुभ्रवस्त्रावृतं |**

**नाहं गच्छति क्षेत्रे हरिनामम् तु भजाम्यहम् ||4||**

- हरिभक्तांना उगा बाह्य शोभेची आवश्यकता नसते . मी फार मोठा हरिभक्त आहे हे कुणाला दाखविण्यासाठी दाढी जटा किंवा शेंडी ठेवण्याची गरज नाही . भगवी किंवा शुभ्र वस्त्रे परिधान करून आव आणण्याची तर मुळीच गरज नाही . अमुक तीर्थक्षेत्री जावे तमुक ठिकाणी जावे असे करण्याचीही गरज नाही . परंतु हरिनामसंकीर्तन हेच धन्य मानावे .

**किदम् युक्तम् इदम् ज्ञानम् येन दंभम् वर्धति |**

**किमर्थम् स कौशल्यम् येन अहंकारम् यच्छति |**

**यत्र हरिनामम् भजति तत्र मिथ्य न तिष्ठति |**

**मां शुच इह हरिनामेव सर्वार्थसाधनम् ||5||**

- अशा ह्या ऐहीक ज्ञानाचा काय उपयोग ज्यामुळे दंभाची वाढ होते . असे हे कलाकौशल्य निरर्थक जे फक्त अहंकार देते . ज्याठिकाणी कर्म करताना हरिनामाचे भजन होते तेथे खोट्या गोष्टींना थारा नाही .
  काळजी नसावी . हरिनाम हेच सर्वकाही (प्रपंच आणि परमार्थ) साध्य करण्यासाठी एकमेव साधन आहे .

## येरझारा

**4 जून 2012**

कुणा ना चुकला येरझारा

ना कुणा व्याधीउतारा

उगा तुडविशी संसार निखारा

शोधिशी कुठवर सुखाचा निवारा

मांडला जयाने विश्वाचा पसारा

रंगला खेळ तयाचा न्यारा .

कर्माची फळे आनंदे चाखशी

धर्माची खळे आंधळे राखशी

जन्ममरणाचा खेळ खेळशी

उगा दैवाचा मेळ शोधिशी

तोचि समर्थ व्यापला दाहिदिशी

राहा निर्भय तयाच्या भरविशी .

# यमदूत

**12 ऑगस्ट 2012**

का आऽऽ वासुनि फिरशी उगाच भवताली माझ्या
आधीच काय कमी आहे मानगुटीवरती बोजा

क्षणोक्षणी पदोपदी अंथरिशी फासे
नाही भुलणार नाही फसणार मृगजळ जरी भासे

इकडे आड तिकडे विहीर
इकडे वणवा तिकडे तिमिर
डोळे वटारून वाट अडवून
जरी बसलास पाय पसरून
नाही भिणार थेट चालणार
जीवनध्येय गाठायला .

संसार थाटला पैपैका गाठला
मांडला पसारा कोण आवरणार?
चारखांदे, सरणशय्या एकदिवशी येणार
धगधगत्या निःष्पाप ज्वाळा कवेत देह घेणार
मित्र, आप्तेष्ट मौन अश्रू ढाळणार
भाविकतले बाप्ये-बायका सूतक पंधरवडा पाळणार
जेव्हा केव्हा येणार असशील, फोन करून ये
खोळंबलेली कामे आटपतो, खुशीखुशीत निरोप घे .

इच्छाशक्ती अभेद्य माझी

जीवन सार्थक करण्याची

सुंदर जीवन जगून जाईन

भीती नाही मरण्याची .

## तृषार्त चातक

**6 जुलै 2012**

चिरडली भुई आकाश फाटले
उन्हाच्या झळयांनी शिवार पेटले
शुष्क कंठात प्राण दाटले
शोकसागरातील अश्रू आटले

वावटळ गेली उडवून धूळ
अवकळा आली कुठुन पांगूळ

नभी नजर चातकाची लागली समाधी
तृषापुर्ती पुरते चातकाला मिळेल का पाणी ?
करड्या ढगांचा थवा उडाला उडाला
कोरड्या चोचीत नाही थेंबही पडला

बरसुदे आता सर बरसुदे सर
भारावला भाता विनवितो आर्त स्वर
करी कृपा देवा बरसुदे जल जल
अमृताहुनही गोड लागी उदकाचे बोल .

## वाटचाल (गझल)

29 जुलै 2012

आता अंधारात चालण्याची सवय झालीय मला
अन् वा-यासंगे बोलण्याची सवय झालीय मला
नव्हता शक्य कधीही एकटा अबोला
आता जगाविना जगण्याची कवय जमलीय मला .

ज्यांना समजले आपले आजवर त्यांनीच उडवले शिंतोडे
शहाण्यांच्या या दुनियेत शहाण्यांनीच ठरवले वेडे
ज्यांना पसंत नाही कधी त्यांनीच केला पंचनामा
रीतच निराळी या जगाची विदुषकालाच रडवले थोडे

चौष्ट घरांच्या खेळात दीन प्यादा चालतोय
निमूटपणे पुढे सरकत, नवीन कायदा पाळतोय
सरळ सरळ दिसतोय समोर मृत्युचा खंदक
डोळे मिटून लपण्यात, दिन ज्यादा टाळतोय

का ओशाळला चेहरा तुझा, पाहुनि माझी झोळी
काही नाही मागणार तुला, जरी उदरात पेटली होळी
पाण्यासारखे माझे आचरण, जिकडे ऊतार तिकडे वळी
तुझ्यात मिसळुनि ना झालो तुझा, भेटली वाटचाल निराळी .

## मुकुलगंध

**30 जुलै 2012**

ऋतु बहरला नवानवा, वाटे मज हवाहवा

मखमली स्पर्शाचा शहारा, फुलवी मनी गारवा

उमटले हवेत अल्हाद मधुर प्रीतीचे तरंग

प्रकटले भवताली अलगद आस्मानाचे सुखदरंग

चाहूल हळुवार तुझ्या येण्याची, लागले जूळु रेशमीवंध

पाहुनि समोरी तुला लाभले सकल "मुकुलगंध".

चांदण्या गगणातल्या अंगणात उतरल्या

बनुनि सुमने प्राजक्ताची सोनसळी उमलल्या

हळुवार हलक्या हाताने ओंजळीत घेतल्या

मिटुनि डोळे जोडुनि कर देवा-यात पूजल्या

अस्मानातून अवनीवर बरसला अमृतानंद

पाहुनि समोरी तुला लाभले सकल "मुकुलगंध" .

## ऋतुचक्र

2 ऑगस्ट 2012

ऋतुमागुनि ऋतु येती घेऊनि नवलाई संगे
बहुरंगी बहुढंगी घेऊनि जादुई सोंगे

अस्मानी मंडपात फुलले लावण्याचे सोहळे
अवनीच्या मंचावर खुलले शृंगारखेळ निराळे

चैत्रपालवी मनांत फुटली, पडले कुणी कुणास पसंत
हिरव्या शालूत नवरी नटली, दिमाखात सजला वसंत

ज्येष्ठ झळया अधिक तापल्या, श्वासही झाला अजून उष्म
बरसली अचानक वळवाची सर, गारा झेलत आला ग्रीष्म

श्रावणधारांत भिजला वारा, शिवारात फुलली हर्षा
माहेरवाशीन झुले झुलली, नाचत रिमझिम आली वर्षा

अश्विनाची घाई सुगीची, सणासुदीला लक्ष्मीचा वरद
निरभ्र निळ्या नभातून, शीतल चांदण्यांत अवतरला शरद

मार्गशीर्षाची हवा गुलाबी, अल्हाद तरंगला आसमंत
सोनेरी चंदेरी स्वप्नांच्या दुनियेत, जरा विसावला हेमंत

माघगारठा अंगी शिरशिर, नको शेकोटी पेटवाया उशीर

पिकली पाने कोकिळ गाणे, रमतगमत चालला शिशिर .

## तुझी जादू

4 जुलै 2012

नजरेस पडल्यापासून तू

घडलीय कसली जादू

जिकडे पाहतो तिकडे तू

प्रतिमेत तू प्रतिबिंबात तू

मनात तू ध्यानात तू

अन् मंतरलेल्या क्षणांत तू

पानांत तू फुलांत तू

दरवळणा-या सुगंधात तू

नजरेत तू डोळ्यांत तू

अन् ओघळणा-या अश्रूंत तू

सुरांत तू तालात तू

अंगात भिनलेल्या लयात तू

चंद्रात तू चांदण्यांत तू

अन् नक्षत्रांच्या नक्षीत तू

सांजेत तू दिवसात तू
अन् पहाटेच्या स्वप्नात तू

सागरात तू अंबरात तू
अन् रिमझिमणा-या धारांत तू

नवल म्हणू की किमया
मनमोहक झाली दुनिया
नवीनवीशी हवीहवीशी
चंदन शीतल छाया .

## मला सूर्य व्हायचय

**24 डिसेंबर 2011**

विछान्यावर डोंगराच्या पहाटेच उठून बसायचय
तांबूस ढगांची चादर ओढून साखरझोपेत हसायचय
झालर धुक्याची सारून बाजूला डोकावून बघायचय
मला सूर्य व्हायचय !

कुक्कुटरावांचा गजर वाजेल मला पाहून
पाखरांची होईल लगबग भूपाळी गाऊन
जांभई देतच "सुप्रभात" सा-यांना म्हणायचय
मला सूर्य व्हायचय !

आकाशातल्या चांदण्यांना प्रकाशात भिजवायचय
गवतावरच्या दवबिंदूंना सोनेरी रंगवायचय
अंगणातल्या प्राजक्ताला चैतन्याने फुलवायचय
मला सूर्य व्हायचय !

आकाशात तरंगत उंचच उंच उडायचय
माथ्यावर पोहचून सृष्टीवर तेज उधळायचय
नटलेल्या वसुधरेला माधुर्याने पाहायचय
मला सूर्य व्हायचय !

दमलेल्या थव्यांसोबत घरट्याकडे परतायचय

सागराच्या नीलम महालात सुखदशयन घ्यायचय

तांबूस ढगांची चादर ओढत "शुभरात्री" म्हणायचय

मला सूर्य व्हायचय !

## एक झलक

**14 डिसेंबर 2011**

तू दिसली नाहीस आज

झाले मन खिन्न खिन्न

पाहुनि हसली नाहीस आज

झाले काळीज छिन्न विछिन्न

नेहमीचेच सारे काही

तरी वाटे मज अनोळखी

का घुटमळे जीव इथे उगी उगी

बोलताना मित्रांसवे का वळुनि पुन्हा वघी

येशील आत्ता नि भेटशील

देशील हात माझ्या हाती

नेशील दुनियेत चंदेरी

घेशील मखमली बाहुपाशी

सांगतोय नाव तुझेच

फलक ह्दयातला

देई मज आनंद

एक झलक जगण्यातला .

# अगस्त क्रांती

**21 अगस्त 2011**

इस बार जो बिजली कडकी है

आग दिलों में भडकी है

नही रूकेंगे, नही झुकेंगे, आगे बढेंगे हम

नही हटेंगे, युंही डटेंगे, जीत जायेंगे हम .

क्रांती की मशाल लिए है कौन आया

देखो देखो मिट गया सारा घना साया

साथ चलो साथ चलो, ज्योत से ज्योत जलात चलो

हात खोलो हात खोलो, विजयी गीत गात चलो .

जन गण मन एकही तमन्ना

हम तुम्हारे साथ है अण्णा

कुशल सुमंगल सौभाग्य बनाने

निकले हम सब अंधेरा मिटाने .

मातरम् मातरम् वन्दे, वन्दे मातरम् .

मातरम् मातरम् वन्दे, वन्दे मातरम् .

## तिरंगा प्यारा

**05 फेब्रुवारी 2012**

स्वतंत्र भारत, गणतंत्र भारत, एकमंत्र भारत न्यारा है |
शानसे लहराता जो ऊंचा, तिरंगा जानसे प्यारा है |

जुल्मका अंधेरा मिटाके, आझाद सवेरा पाया है |
शहीदोंके गुण गाके, हरदिल उभरकर आया है |
सरहदपे लहु बहाके, विजयीध्वज कहलाया है |
विविधता कितनी हो हममे, तिरंगा एकता लाया है |

साहस और समर्पण रगोंमे, केसरी रंग जगाता है |
सत्य और पवित्रता ह्र्दयमे, शुभ्र रंग घुल जाता है |
शांती और समृद्धी मनमे, हरा रंग भर लाता है |
शिक्षा धर्मकी मानवताको, चक्र अशोक सिखाता है |

वतनपे मरमिटने तैयार, ये फौलादी छाती है |
अतुल्य ख्याती इसकी, दशदिशाएं झूम गाती है |
स्वतंत्र भारत गणतंत्र भारत एकमंत्र भारत न्यारा है |
शानसे लहराता जो ऊंचा तिरंगा जानसे प्यारा है |

# बीती बातें

3 मार्च 2012

बीती बाते बीत गयी कल
क्या फायदा दोहरानेसे
बादलोंके संग है उडना
नीले नीले आसमानोमें

कलकी बात करे क्यूं हम
नयी सुबह के साथ चलें हम
पहनके मुस्कान ओठोंपर
भूल जायेंगे सारे गम

हरदिलमे प्यार जगाना
सीखा हमने फूलोंसे
गिरके संभलना उठकर चलना
सीखा हमने पानीसे
डरको मिटाके आगे बढना
सीखा हमने रोशनीसे
ऑधी तुफानसे लढना
सीखा हमने पर्वतसे

बीती बाते बीत गयी कल

क्या फायदा दोहरानेसे

बादलोंके संग है उडना

नीले नीले आसमानोमें

## तू मेरी जिंदगी है

11 जुलै 2012

हसते रोते जागते सोते

तेरी यादे तेरी बातें

करता हूँ मै

रहता हूँ मै खोया खोया

कैसा दिवानापन है

तूऽऽ

आजाना सामने

तूऽऽ

जानेमन जाने

तूऽऽ

मेरी जिंदगी है .

तेरे बिना सुना सुना

मेरा जीना मेरा मरना

तेरे लिए आना जाना

तुझको पाना मेरा मक्सद

तूऽऽ

मेरी किस्मत

तूऽऽ

मेरी चाहत

तूऽऽ

मेरी जिंदगी है .

तुझको देखूं तुझको सोचूं

लम्हा लम्हा प्यारसे सीचूं

तू मिल जाए तो खिल जाए

हो जाए खुशियोंसे पहचान

तूऽऽ

मेरी मुस्कान

तूऽऽ

मेरा अरमान

तूऽऽ

मेरी जिंदगी है .

## मुन्ना टपोरी

14 मे 2012

कायपण झाला झोल, कुठलापण लोच्या

कोईभी हो लफडा, आपला पोपट टोच्या

ये समजल का रे बोऽऽक्या

नाक्यावरचा पक्या, टपरीवरचा मक्या

खास आपले भिडू

नादी नको लागू नको उगा नडू

वनटास फुटले, का मुस्काड फोडू

टप टप टपोरी मुन्ना टपोरी...

ये छप्पन टिकली आता माझी सटकली

शानपट्टी-पाणीपट्टी भर तुझ्या घरी

दमदाटी-चिकटपट्टी लाव तोंडावरी

वटवट-कटकट चालायची नाय

खाली मुंडी टांगीन वर पाय

टप टप टपोरी मुन्ना टपोरी...

हुकमी एक्का सारी दुनिया गुलाम

जुबानका पक्का कमीशनर ठोके सलाम

तू बोलना बिनधास्त क्या है तेरा काम?

बजाके चुटकी यूं करदूंगा तमाम

मर्जीचा मी राजा गल्लीत माझीच चर्चा

टेन्शन कायको लेनेका

कायको करनेका दिमाग खर्चा

टप टप टपोरी मुन्ना टपोरी...

पाटी प्रेमाची अजून कोरी कोरी

नो गर्लफ्रेंड नो टेन्शन नो पोरीबिरी

ढिगळ लावलेली जीन्स ढगळी

उलटी टोपी जगावेगळी

पानसुपारी भटकंती दुपारी

पच्व्यास तोळ्याची त-हा न्यारी

टप टप टपोरी मुन्ना टपोरी...

## मी लोनकर

**25 डिसेंबर 2011**

मी लोनकर, लोनकर, लोनकर डेबीटचा राजा

चाललो डोईवरी घेऊनि कर्जाचा बोजा

वाजतो रिकामा खिसा, पिळतो तुपाने मिशा

राबतो रात्रंदिसा, फेडतो हप्ते वेडापिसा

कर्ज घेताना नाही वाटली लज्जा

मी लोनकर, लोनकर, लोनकर डेबीटचा राजा

हाऊसिंग लोनने फिटवली हौस

कार लोनने केले पुरे बेकार

पर्सनल लोन काढून करतोय मज्जा

मी लोनकर, लोनकर, लोनकर डेबीटचा राजा

मी लोनकर, लोनकर, लोनकर डेबीटचा राजा

चाललो डोईवरी घेऊनि कर्जाचा बोजा

## खेळ खेळूया हसरा (बालगीत)

**21 मार्च 2012**

देवा-यातील फुलांनो सुगंध भवती पसरा

चला . चला मुलांनो खेळ खेळूया हसरा

हाताची सोडा घडी तोंडावरचे बोट

मारूतीच्या शेपटीला बांधा शंभराची नोट

सुपाएवढे कान माझे लांबच लांब नाक

भल्यामोठ्या अंगाला लावली जणू राख

झाडे उपटून फेकीन एवढी माझी शक्ती

ओळखा ओळखा मी कोण ?

गणपती नानाही हत्ती

बरोबर

मऊमऊ अंग माझे हळूहळू चाल

डोक्यावरती शिंगे माझ्या पाठीवरती ढाल

शिवता मला पटकन घेते पोटात पाय

सांगा सांगा मी कोण ?

सांगा सांगा...

गाय

अंहं गोगलगाय .

हलकेफुलके पंख माझे इवल्या माझ्या मिशा

फुलांमधल्या गुळासाठी फिरते साऱ्या दिशा

पकडू नका मुळी मला मारेन डंक अशी

ओळखा पाहू मी कोण ?

भुंगा

नाही रे बजरंगा

माशी

माशी नाही मधमाशी

देवा-यातील फुलांनो सुगंध भवती पसरा

चला . चला मुलांनो खेळ खेळूया हसरा

## संचित सारे अर्पिले

**21 मार्च 2012**

जन्मांतरीचे नाते हे अपुले

मायेच्या ओढीने जपले

पाहुनि पुन्हा तुला समोर

मन माझे हरकले .

सांगू कसे अर्थ शब्दांत लपले

. . . संचित सारे अर्पले .

सोबतीला असताना ना वाटे कसली भीती

सावलीत मायेच्या रूजली स्नेहाची नाती

जिव्हाळ्याचा मळा पोसला नंदनवन फुलले

सांगू कसे अर्थ शब्दांत लपले

. . . संचित सारे अर्पले .

कितीही आले चढऊतार जरी आली किती वळणे

गातच राहू जीवनगाणे नाही मुळीच ढळणे

गेले गेले दिन दुःखाचे आनंदी दिन झुलले

सांगू कसे अर्थ शब्दांत लपले

. . . संचित सारे अर्पले .

# Heart’s Song

4 Feb 2012

Listen what’s your heart is singing
Listen, listen humming something
Hmm, hmm, hmmm…
O, o, o, Hmm, hmm, hmmm…

Sing it louder!
O, o, o, Hmm, hmm, hmmm…

C’mon you’re the one and only
Hmm, hmm, hmmm…

Close your eyes
Wanna pleasant surprise
Ya, ya, ya, yaya…

Again, close your eyes
See what your see
Alright, black all black
Try one more time
Close your eyes
Someone is arrived
Who’s there, coming near n’ near
Who are you?
Am I seeing mirror?
O’Really!
O’yaa!

O, o, o, Hmm, hmm, hmmm…
Sing with me
O, o, o, Hmm, hmm, hmmm…

Louder
O, o, o, Hmm, hmm, hmmm…

Listen what's your heart is singing
O, o, o, Hmm, hmm, hmmm…

## रूसलास कारे कान्हा

**22 ऑक्टोबर 2012**

नाही सांगणार यशोदामाईला

नाही करणार चुगली पुन्हा

मजवरी रूसलास कारे कान्हा

खोडी आधी तूच काढलीस

यात माझा काय गुन्हा

मनगटावरती रूतल्यात अजुनि

तुझ्या हाताच्या खुणा

तरी मजवरी रूसलास कारे कान्हा

घटभर नवनीत आणले तुजसाठी

नाही ठाऊक कुणा
सोडना अबोला मजकडे बघना पुन्हा

असा मजवरी रूसलास कारे कान्हा

खोच शिरी प्रिय मोरपीस हे

नि ऐकव मधुर बासरी पुन्हा

मजवरी नको रूसु रे कान्हा .

## नटखट (नाकाना नामात्रा) 05 फेब्रुवारी 2012

घटधर गवळण चलत चलत

नटखट मदन पथ अडवत

भयवदन सकळ रक्ष रक्ष वदत

वल कर घट पकडत

चल खल नटखट हट पळत

नगर हजर मज न छळत

वनचर धडपड मज न कळत

घट धवलरस मज हव भक्षत

पवन वहण पळभर घनजल बरसत

नगर हजर पद पळत पळत

घट अध पडत उदरभर रस भक्षत

गवळण नयनजल रडत रडत

नटखट कमलनयन सहगण हसत .